# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-**
**{समाज विकास विभाग}**

केंद्रशासन पुरस्कृत दीनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान (DAY-NULM) अंतर्गत 6 शहरी बेघर निवारे सुरू करण्यात आले. त्यापैकी 1 शहरी बेघर निवारा दिनांक 01/12/2017, 4 शहरी बेघर निवारे दिनांक 22/05/2018, व 1 शहरी बेघर निवारा दिनांक 21/06/2021 पासून कार्यरत असून, सदर शहरी बेघर निवाऱ्याचे देखभाल व व्यवस्थापनाकरिता लागणारा निधी शासनामार्फत प्राप्त होत होता. सदर निवारे सामाजिक संस्थांमार्फत संचालित करण्यात येतात. शहरी बेघर निवारे कार्यान्वित करण्याकरिता शासनामार्फत प्राप्त झालेल्या नियमावलीन्वये शहरी बेघर निवाऱ्यांना 5 वर्षापर्यंतच निधी उपलब्ध करून देण्याचे नमूद आहे. त्याअनुषंगाने 6 शहरी बेघर निवाऱ्यांपैकी 5 शहरी बेघर निवाऱ्यांना दिनांक 31/03/2023 पूर्वी 5 वर्ष पूर्ण झाले आहे. तसेच संचालन करणाऱ्या संस्थांची मुदत कालावधी संपुष्टात आल्यामुळे मा. प्रशासक तथा आयुक्त यांच्या मंजुरीन्वये शहरी बेघर निवाऱ्याचे पुढील 3 वर्षाकरिता संचालन करण्याकरिता सामाजिक संस्था / कंपनीची निवड करण्याकरिता https://mahatenders.gov.in या संकेत स्थळाच्या माध्यमातून ई-निविदा काढण्यात आली आहे. सदर शहरी बेघर निवाऱ्याचे देखभाल व संचालन करण्याकरिता येणारा अंदाजित वार्षिक खर्च रू. 76,93,824/- पद क्र. A-२७८०२४४०७०९ (शहरी बेघर निवारा देखभाल, व्यवस्थापन, नवीन बांधकाम व नूतनीकरण) मधून करण्यात येईल. शहरी बेघर निवाऱ्याचे संचालन करण्याकरिता सामाजिक संस्थांची ई-निविदेच्या माध्यमातून खालील नमूद केल्याप्रमाणे निवड करण्यात आली आहे.

| अ. क्र. | शहरी बेघर निवाऱ्याचे नाव | क्षमता | संस्थाकंपनीचे नाव / | ई निविदा रक्कम- (.रू) |
|---|---|---|---|---|
| १ | आधार शहरी बेघर निवारा | ५० | संस्कृती महिला बालविकास बहुउद्देशीय संस्था.नागपूर , | 13,60,956 /- |
| २ | आपुलकी शहरी बेघर निवारा | ५० | संस्कृती महिला बालविकास बहुउद्देशीय संस्था.नागपूर , | 12,39,756/- |
| ३ | आश्रय शहरी बेघर निवारा | ३० | वैष्णवी बहुउद्देशीय शिक्षण संस्था ,नागपूर. | 11,48,256/- |
| ४ | बोधिसत्व शहरी बेघर निवारा | २० | परमात्मा एक बहुउद्देशीय शिक्षण संस्था , .नागपूर | 10,94,700/- |
| ५ | सहारा शहरी बेघर निवारा | ३० | सह्याद्री ग्रामीण विकास व बहुउद्देशीय युवक कल्याण संस्था.नागपूर , | 11,86,656/- |
| ६ | सावली शहरी बेघर निवारा | १०० | संस्कृती महिला बालविकास बहुउद्देशीय संस्था.नागपूर , | 16,63,500/- |
| | **एकूण** | **२८०** | - | **७६,९३,८२४/-** |

उपरोक्त तक्त्यात अनु. क्र. 2 मधील नमूद शहरी बेघर निवाऱ्याचा देखभाल व व्यवस्थापनाचा खर्च दीनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत प्राप्त निधीतून दिनांक 31/05/2026 पर्यंत करण्यात येणार आहे. तद्नंतर आपुलकी शहरी बेघर निवाऱ्याचे देखभाल व व्यवस्थापनाचा खर्च महानगरपालिका निधीतून करण्यात येईल. करीता सदर उपक्रमाअंतर्गत एकूण रू. 76,93,824/- खर्चास प्रशासकीय मान्यता प्रदान करणे तसेच निवड झालेल्या संस्थांना कार्यादेश देण्याचा प्रश्न विचारात घेऊन मंजुरी प्रदान करणे. सदर विषय आर्थिक बाब असल्यामुळे विषयाचे प्रारूप मा. आयुक्त तथा प्रशासक यांना पाठविण्यास्तव सादर प्रस्तुत.

# पारीत ठराव

**ठराव क्रमांक :-** 874/**स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :-** 24/06/2024

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त, समाज विकास विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार केंद्रशासन पुरस्कृत दीनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान (DAY-NULM) अंतर्गत 6 शहरी बेघर निवारे सुरू करण्यात आले. त्यापैकी 1 शहरी बेघर निवारा दिनांक 01/12/2017, 4 शहरी बेघर निवारे दिनांक 22/05/2018, व 1 शहरी बेघर निवारा दिनांक 21/06/2021 पासून कार्यरत असून, सदर शहरी बेघर निवाऱ्याचे देखभाल व व्यवस्थापनाकरिता लागणारा निधी शासनामार्फत प्राप्त होत होता. सदर निवारे सामाजिक संस्थांमार्फत संचालित करण्यात येतात. शहरी बेघर निवारे कार्यान्वित करण्याकरिता शासनामार्फत प्राप्त झालेल्या नियमावलीन्वये शहरी बेघर निवाऱ्यांना 5 वर्षापर्यंतच निधी उपलब्ध करून देण्याचे नमूद आहे. त्याअनुषंगाने 6 शहरी बेघर निवाऱ्यांपैकी 5 शहरी बेघर निवाऱ्यांना दिनांक 31/03/2023 पूर्वी 5 वर्ष पूर्ण झाले आहे. तसेच संचालन करणाऱ्या संस्थांची मुदत कालावधी संपूष्टात आल्यामुळे मा. प्रशासक तथा आयुक्त यांच्या मंजुरीन्वये शहरी बेघर निवाऱ्याचे पुढील 3 वर्षाकरिता संचालन करण्याकरिता सामाजिक संस्था / कंपनीची निवड करण्याकरिता https://mahatenders.gov.in या संकेत स्थळाच्या माध्यमातून ई-निविदा काढण्यात आली आहे. सदर शहरी बेघर निवाऱ्याचे देखभाल व संचालन करण्याकरिता येणारा अंदाजित वार्षिक खर्च रू. 76,93,824/- पद क्र. A-२७८०२४४०७०९ (शहरी बेघर निवारा देखभाल, व्यवस्थापन, नवीन बांधकाम व नूतनीकरण) मधून करण्यात येईल. शहरी बेघर निवाऱ्याचे संचालन करण्याकरिता सामाजिक संस्थांची ई-निविदेच्या माध्यमातून खालील नमूद केल्याप्रमाणे निवड करण्यात आली आहे.

| अ. क्र. | शहरी बेघर निवाऱ्याचे नाव | क्षमता | संस्थाकंपनीचे नाव / | ई निविदा रक्कम- (.रू) |
|---|---|---|---|---|
| १ | आधार शहरी बेघर निवारा | ५० | संस्कृती महिला बालविकास बहुउद्देशीय संस्था, नागपूर | 13,60,956/- |
| २ | आपुलकी शहरी बेघर निवारा | ५० | संस्कृती महिला बालविकास बहुउद्देशीय संस्था, नागपूर | 12,39,756/- |
| ३ | आश्रय शहरी बेघर निवारा | ३० | वैष्णवी बहुउद्देशीय शिक्षण संस्था.नागपूर , | 11,48,256/- |
| ४ | बोधिसत्व शहरी बेघर निवारा | २० | परमात्मा एक बहुउद्देशीय शिक्षण संस्था, नागपूर | 10,94,700/- |
| ५ | सहारा शहरी बेघर निवारा | ३० | सह्याद्री ग्रामीण विकास व बहुउद्देशीय युवक कल्याण संस्था.नागपूर , | 11,86,656/- |
| ६ | सावली शहरी बेघर निवारा | १०० | संस्कृती महिला बालविकास बहुउद्देशीय | 16,63,500/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | संस्था.नागपूर , | |
| | **एकूण** | **२८०** | **-** | **७६,९३,८२४/-** |

उपरोक्त तक्त्यात अनु. क्र. 2 मधील नमूद शहरी बेघर निवाऱ्याचा देखभाल व व्यवस्थापनाचा खर्च दीनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत प्राप्त निधीतून दिनांक 31/05/2026 पर्यंत करण्यात येणार आहे. तद्नंतर आपुलकी शहरी बेघर निवाऱ्याचे देखभाल व व्यवस्थापनाचा खर्च महानगरपालिका निधीतून करण्यात येईल. करीता सदर उपक्रमाअंतर्गत एकूण रू. 76,93,824/- खर्चास प्रशासकीय मान्यता प्रदान करणे तसेच निवड झालेल्या संस्थांना कार्यादेश देण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.